# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२/२०२५** **दिनांक २७/०२/२०२५**

**स्थळ-जिल्हा न्यायालय,अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शुक्रवार दि.२८.०२.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/४१८१/२०२५ दि.२६.०२.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते. तथापी सदरहु सभा काही अपरिहार्य कारणास्तव **गुरुवार दि.२७.०२.२०२५ रोजी सायं. ०५.०० वा. कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** येथे आयोजित करणेत आलेली होती.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.२७.०२.२०२५ रोजी सायं.०५.०० वा. कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** येथे मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.२०.०१.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८०** **दि.२०.०१.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. M/s Oracle Corporation यांचेमार्फत Oracle Database व Oracle ERP या प्रणालीचे कार्यान्वीत Licenses चे नुतनीकरण करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/१** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**२. सशस्त्र सेना ध्वजदिन-२०२४ निधी संकलनाबाबत संस्थानकडून आर्थिक अनुदान देण्याबाबत.**

**निर्णय क्र.८१/२** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**३. श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थींसाठी जर्मन तसेच जपानी भाषेचे प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/३** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**४. ग्रीन अॅण्ड क्लिन शिर्डी फाऊंडेशन, शिर्डी आयोजित “शिरडी महापरिक्रमे” साठी संस्थानमार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या सोई-सुविधा.**

**निर्णय क्र.८१/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

----------------------------------------------------------------------------------------------------------------

**५. महाराष्ट्र MHT-CET परीक्षा तयारीसाठी अभ्यास प्रशिक्षण वर्ग (Crash Course) सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

----------------------------------------------------------------------------------------------------------------

**६. संस्थान प्रकाशित तेलुगू व इतर भाषेतील श्री साई सच्चरितातील दुरुस्त्यांबाबत.**

**निर्णय क्र.८१/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

----------------------------------------------------------------------------------------------------------------

**७. शिर्डी विमानतळावर कार्यरत असलेल्या २०० CISF सुरक्षा कर्मचा-यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील साई धर्मशाळा इमारतीमधील डी विंग रहिवास प्रयोजनार्थ भाडेतत्वावर मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचा दि.२०.०१.२०२५ रोजीचा निर्णय क्र.३३ रद्द होऊन फेर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

----------------------------------------------------------------------------------------------------------------

८. मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार विद्युत विभागाकरीता दैनंदिन इलेक्ट्रीकल व मेन्टेनन्स कामाकरीता लागणारे विद्युत संबंधीत साहित्य खरेदी संबंधीत साहित्याचे वार्षिक दर निश्चित करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदेमध्ये निविदाधारकांनी देऊ केलेले प्रस्तावात नमुद केलेनुसार प्रती नग न्युनतम दर स्विकारुन त्यांना कार्यादेशाचे दिनांकानुसार पुढील एक वर्षाचे कालावधीकरीता इलेक्ट्रीकल साहित्य निर्धारित केलेल्या दराप्रमाणे आवश्यकतेनुसार पुरविणेकामी संबंधीत पुरवठाधारकास कार्यादेश देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.८१/८** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

९. श्री साईबाबा नवीन दर्शन कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवुन नवीन कॉन्ट्रक्टरची नेमणूक होईपावेतो आहे त्याच ठेकेदारास मागील वर्षाचे दरात मुदतवाढ कार्यादेश देणेबाबत.

**निर्णय क्र.८१/९** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

१०.श्री साई प्रसादालय इमारतीचे छतास असलेल्या कौलारु डोमचे नुतनीकरण व वॉटरप्रुफिंग करणे कामाचे ठेकेदार श्री.यशवंत दिनकर गाडे यांचे काम निविदाशर्तीनुसार काढून घेणेकामी तसेच राहिलेल्या ०४ डोमचे काम ई-निविदा काढून पुर्ण करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.८१/१०** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**११.साईआश्रम भक्तनिवास येथील A,B व C इमारतीतील VRV ए.सी.यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता मे.डायकिन एअरकंन्डीशनींग इंडिया प्रा.लि.पुणे यांना कॉम्प्रेहेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/११ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.३ सन २०२५-२६ (माहे जुन-२०२५ ते मे-२०२६) करीता मोतीचुर लाडू प्रसाद तयार करुन पॅकींग लाडू पाकीटे विक्री काऊंटरपर्यत पोहोच करणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणे इ. कामांसाठी अदा करणेत येणारी वार्षिक उक्ती मजुरी दरांची अंदाजे रक्कम रु.२.४४ कोटी मात्रचे खर्चाची ई-निविदा मागविणेस व सदर प्रक्रियेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८२ प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४ सन २०२५-२६ (माहे एप्रिल-२०२५ ते मार्च-२०२६ अखेर) बुंदी प्रसाद तयार करुन उत्पादन तारखेचे शिक्के मारुन पॅकिंग करुन घेणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदा मधील न्युनतम (L1) दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.८३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.५ सन २०२५-२६ करीता भाजीपाला खरेदीसाठी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.८४ दरांचे विश्लेषन करुन पुन:श्च सादर करावे. (कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.६ साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता उशी व खुर्ची खरेदी करणेकामी व साईबाबा भक्तनिवास विभागाकरीता खुर्ची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८५** उशी खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजुर. खुर्चीबाबत तांत्रिक तपासणी करुन फेर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास विभाग)

---

**विषय नं.७** साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता बेडशीट उशीकव्हरसह खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.८६** प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास विभाग)

---

**विषय नं.८** साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर धुणे, व इस्त्री करणे, टॉवेल धुवून इस्त्री करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवुन नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपावेतो आहे त्याच मागील वार्षिक मंजुर दरात मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.८७** प्रस्ताव मंजुर. संस्थानची नवीन लॉण्ड्री युनिट उभारणेचा प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास विभाग/बांधकाम विभाग)

---

**विषय नं.९** साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, स्वच्छता कामाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपावेतो आहे त्याच मागील वार्षिक मंजुर दरात मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.८८** प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास विभाग)

---

**विषय नं.१०** माहे एप्रिल-२०२५ ते मार्च-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून श्रींचे व्दारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.८९** प्रस्ताव मंजुर. संस्थानचे गोशाळेचा प्रस्ताव तयार करुन समितीपुढे सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-मंदिर विभाग/बगीचा विभाग)

---

**विषय नं.११ श्री व्दारकामाई समोरील भिंतीवरील निंबराचे वरील भागात सुवर्ण “ओम (ॐ)” देणगीदाखल बसविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९० तहकुब.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.१२ श्री साईबाबांना निमंत्रण पाठविणा-या साईभक्तांना प्रसादरुपी शॉल व उदीप्रसाद आशिर्वादपर पत्र देणेबाबत.**

**निर्णय क्र.९१ साईबाबांचा थ्रीडी फोटो (पॉकेट साईज) उदी प्रसाद व शुभेच्छापत्र पाठविण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.१३ एकादशी, स्थानिक उत्सव व संताच्या पुण्यतिथीचे किर्तन कार्यक्रमांचे नियोजनाबाबत.**

**निर्णय क्र.९२ प्रस्ताव मंजुर. किर्तनकार निवडीचे निकष मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ठरवावे. संस्थानचे कर्मचा-यांना मानधन देय राहणार नाही.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.१४ श्री साईबाबा समाधी मंदिर सभामंडपामध्ये श्री साईबाबांचे समकालीन भक्त कै.रावबहादुर हरी विनायक साठे यांचा फोटो लावणेबाबत श्री.दुर्गाप्रसाद साठे, सांगली यांचे दि.२०.१०.२०२४ रोजीचे विनंती पत्राबाबत.**

**निर्णय क्र.९३ तहकुब.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.१५ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील विद्यार्थी ने-आण करणेकरीता ०४ नवीन स्कुलबस खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९४ तहकुब.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.१६ शिर्डी नगरपरिष्द हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही पहाणी अहवाल नोंद घेणेकामी सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.९५ अवलोकन करुन नोंद घेतली.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.१७ सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामधील संस्थानच्या विविध विभागांकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी भंगार/सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.९६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.१८ आर्थिक वर्ष २०२४-२५ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२५-२६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९७ फेर आढावा घेऊन प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.१९ खाजगी बॅंकामध्ये संस्थानचे खाते उघडुन विविध सेवा घेणेसाठी संस्थान अधिनियमातील तरतुदींमध्ये बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.९८ तहकुब. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.२० माहे जुन-२०२४ ते नोव्हेंबर-२०२४ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या गाईचे शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालांबाबत.**

**निर्णय क्र.९९ अवलोकन करुन नोंद घेतली. (कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री रामनवमी उत्सव-२०२५ (वर्ष ११४ वे) साजरा करणे व त्यामधील कार्यक्रमांचे नियोजन करणे तसेच याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. १०० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२२** **श्री.अविनाश विनायक कुलकर्णी, प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा यांचे दि.०९.०४.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.१०१ अपील मान्य.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री.कैलास सोनाजी खराडे, (सेवानिवृत्त) प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा यांचे दि.२१.०३.२०२४ रोजीचे अपील अर्जावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.१०२ अपील मान्य.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४** **श्री.कैलास सोनाजी खराडे, (सेवानिवृत्त) प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा यांचे दि.०१.०१.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.१०३ अपील मान्य.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२५** **श्री.सुर्यकांत केशव भोसले, प्र.वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा यांचे दि.२५/०३/२०२४ रोजीचे अपील अर्जावर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१०४ अपील अमान्य.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२६** **श्री.काकासाहेब पंढरीनाथ ढेमरे, लिपीक-टंकलेखक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि.०५.०१.२०२४ रोजीचे अपील अर्जावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.१०५ अपील अमान्य.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७ श्री.विठ्ठल तुकाराम पवार, मदतनीस, साई आश्रम भक्तनिवास यांचे दि.२१.०३.२०२४ रोजीचे अपील अर्जावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.१०६ अपील मान्य.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२८ श्री.गणेश शिवाजी धाकतोडे, सहाय्यक शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.१९.०२.२०२४ रोजी केलेल्या अपील अर्जाबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.१०७ अपील अमान्य.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२९ श्री. संजय मारुती शेटे, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१०८ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३० श्री. मच्छिंद्र जयसिंग आधुडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१०९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३१ श्री.रविंद्र मधुकर वाघमारे, मदतनीस, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.११० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३२** **विनापरवानगी गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना डयुटीवर हजर करुन घेणेबाबत केलेल्या विनंती अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१११** **प्रस्ताव मंजुर. शपथपत्र घेऊन डयुटीवर हजर करुन घेण्यात यावे.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३** **संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२४-२५ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.११२** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३४** **संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी व ठेकेदारामार्फत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा सन २०२४-२५ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र.११३** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३५** **शिर्डी संस्थान मंदिर परिसरातील निर्माल्य साठविण्यासाठी जागा व निर्माल्यापासून तयार केलेले उत्पादने विक्रीसाठी जागा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११४** **तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३६** **शिर्डी शहरातील बिरेगाव शिव विकास योजना १८.० मि. रुंद (स.नं.२०६ व २०७) रस्त्याचे कामाबाबत एफएसआय/टीडीआर प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.११५** **नगररचना विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३७** **संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५ पै.मध्ये सुरु असलेले श्री साईनाथ हायस्कुल स.नं.१०९ मधील जुनी कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कुल या जागेत स्थलांतर करणेबाबत.**

**निर्णय क्र.११६** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३८** **M/s Terralogic Software Solutions Pvt. Ltd. व M/s Oasys Tech Solutions Pvt. Ltd. यांनी अनुक्रमे संस्थानचे अधिकृत वेबसाईट व सोशल मिडीया संदर्भातील अनुषंगीक कार्यवाही त्यांचेमार्फत विनामोबदला स्वरुपात करुन देणेबाबत ई-मेलव्दारे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.११७** **तहकुब.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३९** **संस्थान परिसरात साईभक्तांकरीता डिजीटल लगेज लॉकर्सची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.११८** **प्रायोगिक तत्वावर १०० लॉकर सुरु करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.४०** **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ (RTE Act-2009) अन्वये इयत्ता १लीचे नवीन प्रवेशानुसार २५ % प्रमाणे ६२ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११९** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.४१** **शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील विधवा महिला पाल्य मोफत शिक्षण योजना, लाभार्थी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणेस व याकामी येणा-या एकुण खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.४२** **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ज्युनियर के.जी.वर्गासाठी ऑनलाईन पध्दतीने नवीन विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया राबविणेस व मर्यादीत २५० बालकांना प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२१ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.४३** **ऑगस्ट-२०२५ सत्रासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राज्यशासनाव्दारे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत व प्रवेशामध्ये संस्था स्तरावर २० टक्के मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेमधुन (CAP) भरणेबाबत.**

**निर्णय क्र.१२२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**विषय नं.४४** **संस्थान प्रकाशित विविध भाषेतील श्री साई सच्चरित ग्रंथ व इतर पुस्तकांचे पडताळणी (Proof Reading) कामी व साईभक्तांच्या संस्थान प्रकाशने विषयी प्राप्त सुचनांचे निरसन करणेकामी प्रत्येक भाषेतील साहित्य अभ्यासक साईभक्तांचा पॅनेल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४५ श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोंबर-२०२४ ते डिसेंबर-२०२४ कालावधीत अंतंरुग्ण व बाहयरुग्णांवर करण्यात आलेल्या रु.२,९६,४९,५०८/- वैद्यकीय उपचाराची व त्यामध्ये देण्यात आलेल्या रु.२,८८,८९,९२६/-सवलतीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१२४ नोंद घेऊन मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४६ संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त HIMS संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेकामी आवश्यक Server उपलब्ध करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४७ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे वार्षिक औषधे खरेदीमधील Tablet-Injections-Syrup-Ointment-Drop, Dental, X-Ray-CT-MRI Film, Laboratory, Miscellaneous, Ayurvidec, Suture Material. O.T. Surgical and Dialysis, Cathlab and Cardiac Surgical Material खरेदीकामी दर निश्चिती (Rate Contract) करणेकामी पुरवठा आदेश देणेस व ज्या मटेरियलकरीता पुरवठा आदेश जात नाहीत त्याकरीता फेर ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४८ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे मशिनरी व उपकरणे खरेदीकामीच्या प्राप्त निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१२७ प्रस्ताव मंजुर. दरपत्रके मागविणे ऐवजी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४९ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Hospital & Office Furniture व Consumable/Sundry Item खरेदी करणेकामी निम्नतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१२८ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५० श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे Cold Centrifuge खरेदीकामी फेर ई-निविदा मागविणे व Harmonic Cautry खरेदीकामी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५१ बाहययंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत कार्यरत बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनवाढ तसेच रजा सुट्टया मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१३० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५२ नेत्र रोग तज्ञ व स्त्री रोग तज्ञ या पदावर काम करणेस मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१३१ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५३ श्री.विकास शांतवन शेलार, लिपीक-टंकलेखक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१३२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५४** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.९,१९,६९२/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५५** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.७,४७,०८२/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव फेर सादर.**

**निर्णय क्र.१३४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५६** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१६,२२,२२६/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव फेर सादर.**

**निर्णय क्र.१३५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५७** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु. ६,७९,३४१/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव फेर सादर.**

**निर्णय क्र.१३६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५८** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.४,३५,१५३/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव फेर सादर.**

**निर्णय क्र.१३७ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५९** **संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव-२०२५ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी निम्नत्तम निविदाधारक न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापुर, ता.राहुरी यांनी चर्चा वाटाघाटी अंती ई-निविदा रकमेत देऊ केलेली सुट नुसार रु.४६ लक्ष मात्रची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१३८ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६०** **संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नवीन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यामधुन पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता येणारे रक्कम रु.२,३८,०९,९५४/- मात्रचे खर्चास तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तसेच मा.विधी व न्याय, विभाग महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेऊन विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३९ प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**
**(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.६१** **संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५ पै.मध्ये श्री साईनाथ हायस्कुल सुरु असलेल्या ३७.१७ आर जागेवर श्री साईबाबा हॉस्पिटलचे विस्तारीकरण करणेसाठी आर्किटेक्ट/ सल्लागार यांची नियुक्ती करणेसाठी E-RFP (E-Request For Proposal) प्रस्ताव मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.१४० संस्थानमार्फत प्राथमिक आराखडा तयार करण्यात यावा. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६२** **श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात स्टॉंगरुममध्ये बांधकाम करणेसाठी रक्कम रु.६७,६२,०००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४१ प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**
**(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.६३** **संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) परिसर, अधिकारी व डॉक्टर्स निवासस्थाने व वाहन विभाग येथील मुख्य रस्ते दुरुस्त करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत येणारे रक्कम रु.२,२९,२७,९६०/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४२** **प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.६४** **साई आश्रम भक्तनिवास येथील आऊटडोअर ३२० केव्हीए जनरेटर, काम्पॅक्ट, सबस्टेशन व मिटरींग युनिटकरीता बंदिस्त शेड उभारणेकामी निम्नतम निविदाधारक कौस्तुभ दिनेश कुलकर्णी, शिर्डी यांची रु.८,०३,८०५/- मात्र इतक्या निम्नतम दराची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१४३** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६५** **श्री साईबाबा हॉस्पिटल एम.आर.आय.विभागाचे समोर रुग्ण व रुग्णांचे नातेवाईकांचे ऊन, वारा व पाऊसापासून संरक्षण होणेसाठी बैठक व्यवस्थेसह शेड उभारणेसाठी निम्नतम निविदाधारक कॉन्क्रीट सोल्युशन्स, नाशिक यांची रु.२५,२७,७०२/-मात्र इतक्या निम्नतम दराची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१४४** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६६** **शैक्षणिक संकुल प्रकल्पाकरीता इंटेरिअर वर्क, खेळाची मैदाने विकसीत करणे, ऑडीटोरीअम करीता एच.व्ही.ए.सी.करणे व अनुषंगीक सिव्हील व इलेक्ट्रीकल इ.कामे करणेकामाचे ठेकेदार शानदार इंटेरिअर प्रा.लि.पुणे यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**निर्णय क्र.१४५** **कामाची सद्यस्थिती पाहता १० एप्रिल,२०२५ पर्यंत मुदवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६७** **शिर्डी संस्थान वाढीव पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ (सुधारीत) करीता सल्लागार मानवसेवा कन्सल्टंट, धुळे यांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण पाहून त्यानुसार प्रकल्पासाठी येणारे अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास व प्रकल्पाचे कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१४६** **तहकुब.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६८** **शिर्डी संस्थान व कनकुरी वाढीव संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ (सुधारीत) करीता सल्लागार मानवसेवा कंन्स्लंटंट, धुळे यांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर प्रकल्पासाठी येणारे रक्कम रु.११०.१० कोटी मात्रचे अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास तसेच प्रकल्पाचे कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणे व इतर अनुषंगीक बाबींवर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१४७** **तहकुब.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६९** **श्री साईबाबा संस्थानचे विज बिलात आर्थिक बचत होणेचे तसेच भविष्यात हरित ऊर्जा, पर्यावरण, विकासात्मक दृष्टीकोनातुन MSETCL यांचे CSR फंडातुन संस्थानचे विविध इमारतींचे टेरेसवर अपारंपारिक ऊर्जा अंतर्गत १७०१.१२ kwp क्षमतेचा ग्रिड कनेक्टेड रुफ टॉफ सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्पाव्यतिरिक्त उर्वरीत इमारतींचे रुफ टॉफ सोलर उभारणीकामी व त्यासंबधीत इतर सर्व अनुषंगीक कामे करणेकामी संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६,८०,००,०००/-(सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४८** **प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग/विधी विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.७०** **श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या पवनचक्की यंत्रणेची निर्माण होणारी वीज ही संस्थानचे मंदिर परिसर व नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्स मधील सबस्टेशनकरीता Captive Open Access द्वारे वापरुन उर्वरित(Over Injected) युनिटचा वापर संस्थानचे अहोरात्र सुरू असलेल्या व जादा वीजेचा वापर असलेल्या विभागात वापरात आणणेकामी स्पेशल एनर्जी मीटर स्थापित करणे व त्यासंबंधीत इतर सर्व अनुषंगिक कामे करणेकामी सर्व संबंधीत तज्ञ सल्लागारांसमवेत सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यवाही कामी संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित रक्कम रु.१,१३,२८,०००/- (सर्व करासहित) मात्रचे तसेच इतर शासकीय/MSDCL/MSTCL/ MSLDC फी चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४९ प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.७१** **व्दारावती इमारत भक्तनिवास समोरील गार्डनमध्ये श्री साईभक्तांचे मनोरंजनाकरीता गार्डन स्पिकर व इतर तद्‌अनुषंगीक साऊंड सिस्टीम संबंधीत साहित्य संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१५० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **मंदिर परिसरात श्री राम मंदिर व श्री कृष्ण मंदिर यांचे बांधकाम करणेबाबत तसेच श्री दत्त मंदिराचे नुतनीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.१५१ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **नवीन दर्शन रांगेत स्टेनलेस स्टील रेलींग बसविणेकामी येणा-या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.१५२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **श्री साई प्रसादालयातील एअर व्हेंटीलेशन व एक्झॉस्ट यंत्रणा बायबॅक करुन नवीन यंत्रणा बसविणेस मान्यता मिळणेबाबत .**

**निर्णय क्र.१५३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **सौ.रेखा मोहन सकने, कंत्राटी परिचारीका, साईनाथ रुग्णालय यांना कर्करोग (कॅन्सर) आजाराची रजा लागु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१५४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ वैद्यकीय अधिकारी यांच्या मुलाखती घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१५५ निवड समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, वैद्यकीय संचालक, जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा समावेश करुन मुलाखती घेण्यात याव्यात.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**वरील निर्णय क्र.८० ते १५५ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ९.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**